## भान - समाजऋणाचे

आदर्श शिक्षिका म्हणून राष्ट्रपतीपुरस्कार प्राप्त झालेल्या विद्याताईंना निवृत्त होऊन एक वर्ष झाले होते. मुलगा आदित्य, मुलगी अनघा व दोन नातवंडं असे त्यांचे छानसे कुटुंब होते.

दिवाळी अतिशय आनंदात पार पडली. त्यांचा छोटासा टुमदार बंगला दिव्यांच्या रोषणाईने अजूनही झकाकत होता. हसत खेळत जेवणं झाली. विद्याताईंनी नातवंडांना बाहेर खेळायला पाठविले. आपल्या मुलांना जवळ बसविले व त्या बोलू लागल्या.

"आजच्या अत्यंत आनंदाच्या वेळी मी तुम्हाला माझा मनोदय सांगणार आहे. मी येत्या जून महिन्यापासून नर्मदा किनारी आदिवासी मुलांच्या निवासी शाळेत तेथील मुलांना शिकविण्यासाठी जाणार आहे व तेथेच राहणार आहे."

आईने उच्चारलेले वाक्य ऐकून प्रथम दोन्ही भावंडं क्षणभर आश्चर्यचकीत झाली. काहीही कल्पना नसतांना आईने असा निर्णय घेतला त्याचे कारण शोधू लागली. आपले काही चुकले आहे का? आईला वाईट वाटेल, तिचा स्वाभिमान दुखावेल असे आपणाकडून नकळत काही घडले का याचा विचार करू लागले. डोळ्यातून अश्रुंच्या धारा वाहू लागल्या. विद्याताईंनी मुलांना प्रेमाने जवळ घेतले. त्या म्हणाल्या: "मुलांनो, तुमचे काहीही चुकलेले नाही. तुम्ही अत्यंत गुणी, सुसंस्कारित व उच्चशिक्षित आहात. मी अत्यंत तृप्त व कृतार्थ आहे. मी एक शिक्षिका आहे. संस्कारक्षित व उत्तम नागरिक तयार करणे हे माझे कर्तव्य आहे. वयाच्या ५८ वर्षापर्यंत मी हेच कार्य अत्यंत निष्ठेने केले आहे. त्याचा यथोचित सन्मान ही मला मिळालेला आहे. कुटुंबासाठी असलेले माझे कर्तव्य मी योग्य रितीने पार पाडले आहे. माझी मुले कुणाच्याही आधाराशिवाय उत्तम जीवन जगण्यासाठी सक्षम झालेली आहेत. याचा मला अभिमान आहे. आता उर्वरित आयुष्य मी ज्यांना माझी गरज आहे त्यांच्यासाठी खर्च करणार आहे. गाव पाड्यावर राहणाऱ्या आदिवासी मुलांना शिक्षणासोबत चांगले संस्कार, चांगली जीवन पद्धती, चांगले आचार विचार शिकविण्याचा माझा मानस आहे. प्रत्येकाच्या आयुष्यात असलेले समाजऋण अंशतः फेडण्याचा प्रयत्न करणार आहे."

Sundaram
FOR EDUCATIONAL USE

आदित्य व अनघा अजूनही सावरले नव्हते. अश्रुंच्या धारा सतत वाहतच होत्या. आई आणि वडिल दोघांचेही कृपाछत्र देणारी आई. तिच्या विरहाच्या कल्पनेनेच ती व्याकुळलेली होती. नातवंडांना याची पुसटशीही कल्पना नव्हती.

पण विद्याताईंचा निर्णय अटळ होता. त्या आपल्या निर्णयावर ठाम होत्या.

गहिवरलेल्या कंठाने आदित्य म्हणाला, "आई, तुझे म्हणणे मला पटते आहे. तू आजपर्यंत समाजासाठी जे करीत आली आहेस ते मी अनुभवलेले आहे. यापुढेही तू त्याच मार्गाने कार्य करीत रहावे. आम्ही कधीही तुझ्या कार्यात अडथळा करणार नाही. शक्यतो तुला आमच्या परीने सहाय्य करण्याचाच प्रयत्न करु. मात्र तू आम्हाला सोडून दूर राहण्याचा विचार सोडून दे. तुझ्या वात्सल्याच्या छायेत आम्हाला कायम राहू दे." आदित्यच्या म्हणण्याला अनघाही दुजोरा देत होती.

विद्याताई म्हणाल्या, "अरे बाळा, मी कुठेही राहिले तरी माझी माया तुमच्यावर राहणारच आहे. मी नर्मदा किनारी राहण्याचा निर्णय का घेतला याला कारण आहे. आता माझे वय वानप्रस्थाश्रमाचे आहे. या वयात मोह व माया यांच्या बंधनातून हळूहळू मुक्त व्हावयास हवे. मी तुमच्या जवळ राहिले तर अधिकाधिक मायेत गुरफटत राहीन. नर्मदेचा किनाराच का निवडला...तर नर्मदेच्या किनारी अनेक साधु संतांचे आश्रम आहेत. त्यांचा सहवास घडेल. त्यांचा उपदेश कानी पडेल. मानव जन्माचे सार्थक कशात आहे याचे मार्गदर्शन मिळेल. मी दोन वर्षांपूर्वी नर्मदा परिक्रमा केली होती. त्यावेळी आलेल्या अनुभवामुळे व अनुभूतीमुळे मी खूप प्रभावित झाले होते व त्याच वेळी मी हा निर्णय घेतलेला होता.

आदिवासी मुलांना शिकवावे असे वाटते कारण आपल्याजवळ जे काही आहे ते शेवटपर्यंत देत रहावे ही आपल्या धर्माची शिकवण आहे. या शाळेत शिकविण्याचे मी कुठलाही मोबदला घेणार नाही. वेतन घेणार नाही. नर्मदेच्या पवित्र जलाने मन व बुद्धि शुद्ध होईल. पावन होईल. नर्मदा ही मोक्षाप्रती नेणारी मोक्षदायिनी आहे.

तुम्ही माझी मुळीच चिंता करु नका.

संपर्कही करु नका. मला माझ्या या जन्माचे सार्थक करण्यासाठी प्रेरणा द्या व आनंदाने निरोप द्या."

आईचे सर्व बोलणे आदित्य व मनवाने मनःपूर्वक ऐकले. त्यांनी आनंदाने होकार दिला. विद्याताईंच्या संस्कारात वाढलेली ती मुले होती. आईच्या पावलावर पाऊल ठेवून ते दोघेही याच मार्गाने जाणार होते.

आज दोन्ही मुले स्वतःला धन्य मानत होती. अशा आईच्या उदरी आपण जन्म घेतला आहे या बद्दल ~~स्वतः बद्दल~~ ~~कृतकृत्य~~ कृतकृत्यता मानत होती.

त्यांनी आईच्या निर्णयाचे आनंदाने स्वागत केले. मनोमन आईला दीर्घायुरारोग्य लाभो अशी ईश्वरचरणी प्रार्थना केली.

—०—०—



सौ. शोभा पांडे
गुरुगणेश नगर कोथरूड पुणे

